पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
व्यवस्थापन परिषदेच्या २०९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
बुधवार, दि.०७ जानेवारी, २०२६ रोजी दुपारी ०१:०० वा.

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०९ वी बैठक **बुधवार, दि.०७ जानेवारी, २०२६ रोजी दुपारी ०१:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. आय. जे. तांबोळी | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | अनुपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १८) | डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अभिनंदन:**

१. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० चे भारतीय उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या अनुषंगाने असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) यांनी इंडियन नेटवर्क फॉर इंटरनॅशनलायझेशन ऑफ हायर एज्युकेशन (INIHE) च्या बॅनरखाली जपानी शैक्षणिक आणि औद्योगिक संस्था, विद्यापीठे यांच्यासोबत चर्चासत्रे आणि द्विपक्षीय बैठकीकरिता मा.कुलगुरु महोदय यांना आमंत्रित केल्याबद्दल त्यांचे सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

२. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १६ वी राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा "उत्कर्ष २०२५-२६" मध्ये प्रस्तुत विद्यापीठास सर्वसाधारण विजेतेपद मिळाल्याबद्दल व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्री. महादेव धरेप्पा कमळे व डॉ. अजित माधव पाटणकर यांनी आपली अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | दि.०८ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०८ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.०८ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०८ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ २ ] | १) दि. २५ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि. २६ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>३) दि.०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०५ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>४) दि. १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०६ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १) दि. २५ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>२) दि. २६ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>३) दि.०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०५ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>तसेच सदर कार्यवृत्तांतातील ठराव क्र. १ अन्वये गठीत चौकशी समितीस अहवाल सादर करण्यासाठी दि.२८ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.<br>४) दि. १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०६ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली. | अभियांत्रिकी विभाग |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ३ ]</td><td>

**सन २०२५-२६ च्या सुधारीत अर्थसंकल्पास व सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पास मान्यतेची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचा सन २०२५-२६ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरिता समान लेखा संहिता कलम २.१२ (i) नुसार वित्त व लेखा समितीची उपसमिती मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे गठीत करण्यात आली होती.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्याचे नाव</th><th>पद</th></tr>
<tr><td>१)</td><td>प्रा. देवानंद काशीनाथ चिलवंत, मा.कुलपती नियुक्त वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषद सदस्य</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२)</td><td>प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३)</td><td>प्राचार्य डॉ. एस. व्ही. शिंदे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४)</td><td>डॉ. बी. एन. आदटराव</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५)</td><td>सीए डॉ. एम. एस. खराडे, वित्त व लेखा अधिकारी</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>

उपरोक्त उपसमितीने दि.२४/११/२०२५ ते २९/११/२०२५, दि.१६/१२/२०२५ व दि.२०/१२/२०२५ दरम्यान विविध विभाग / संकुले प्रमुखांसोबत त्यांची मागणी, जमा व खर्चाचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा केली. मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमा व खर्च, त्यांची चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा, खर्च व त्यांची मागणी तसेच पुढील वर्षातील होणारी जमा व खर्चाचे नियोजन व उपलब्ध निधी इत्यादीबाबत आढावा घेण्यात आला व त्यानुसार सुधारीत व मूळ अंदाजपत्रकीय अंदाज ठरविण्यात येऊन सन २०२५-२६ चा सुधारीत व सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्पनाचा मसूदा तयार केला आहे.

विद्यापीठाचा सन २०२५-२६ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्पास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ९४ (६) (क) नुसार व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यासाठी वित्त व लेखा समितीच्या दि.३०/१२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र. ०२ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वंकष चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

<table>
<tr><td>ठराव:</td><td>सन २०२५-२६ च्या सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पावर सर्वंकष चर्चा होऊन दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.</td></tr>
</table>

सबब, विद्यापीठाचा सन २०२५-२६ च्या सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह केलेली मान्यतेची शिफारास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९४ (६) (क) व ३१ (ज) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

</td><td>वित्त व लेखा विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**सन २०२५-२६ च्या सुधारित अर्थसंकल्पाबाबत व सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पाबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ज) अन्वये दुरुस्तीसह मान्यता देऊन सर्वानुमते अधिसभेस शिफारस करण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ४ ] | दि.२९/१२/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.२९/१२/२०२५ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दि.२९/१२/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | दि.२९/१२/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ५ ] | **आगार व्यवस्थापक, रा. प. सोलापूर आगार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सोलापूर विभाग, सोलापूर आगार यांना रंगभवन येथील अक्कलकोट रोड येथून वाहतूक होणाऱ्या रा. प. बसेसचे पिक अप शेड बुकींग (तिकीट) सेंटरला अभ्यासकेंद्र येथून तात्पुरते विद्युत कनेक्शन व्यवसायिक प्रती युनिट दराने देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: आगार व्यवस्थापक, रा. प. सोलापूर आगार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सोलापूर विभाग, सोलापूर आगार यांचे जाक्र./राप/आव्यसो/ प्रशा/५१४ रा.प. सोलापूर आगार दि.०९/१२/२०२५ रोजीचे पत्र कृपया अवलोकनार्थ.<br>आगार व्यवस्थापक, रा. प. सोलापूर आगार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सोलापूर विभाग, सोलापूर आगार यांना रंगभवन येथील अक्कलकोट रोड येथून वाहतूक होणाऱ्या रा. प. बसेसचे पिक अप शेड बुकींग (तिकीट) सेंटरला अभ्यासकेंद्र येथून तात्पुरत्या स्वरुपात वीज कनेक्शन देण्यात यावेत. सदरच्या विद्युत वापरासाठी दरमहा येणारे विद्युत बिल रा. प. महामंडळ, सोलापूर विभागामार्फत अदा करण्यात येईल असे नमुद करुन विज कनेक्शन देण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती केली आहे.<br>याबाबत सादर करण्यात येते की, सदर विद्युत पुरवठा देण्यासंदर्भात तारतंत्री यांनी खालील तांत्रिक अडचणी असल्याचे तोंडी सांगितले आहे.<br>१) अभ्यासकेंद्रास असलेला विद्युत पुरवठा लोड क्षमता मर्यादीत असल्याने तेथील वीज पुरवठ्यावर/वायरिंगवर लोड/भार पडू शकतो.<br>२) सदर वीजपुरवठा दिल्यास येणाऱ्या वीज देयकामध्ये (Traiff) प्रती युनिटच्या दरामध्ये वाढ होवून देयक प्राप्त होवू शकते.<br>३) सदर वीज पुरवठा करण्यापुर्वी महावितरण कार्यालयाची पुर्व परवानगी घ्यावी लागणार आहे.<br>४) प्राप्त देयकानुसार व्यवसायिक प्रती युनिट दराने दर आकारणी करावी लागणार आहे.<br>सबब, आगार व्यवस्थापक, रा. प. सोलापूर आगार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सोलापूर विभाग, सोलापूर आगार यांना रंगभवन येथील अक्कलकोट रोड येथून वाहतूक होणाऱ्या रा. प. बसेसचे पिक अप शेड बुकींग (तिकीट) सेंटरला अभ्यासकेंद्र येथून तात्पुरते विद्युत कनेक्शन व्यवसायिक प्रती युनिट दराने देण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ६ ] | **विद्यापीठातील विविध संकुले व विभागाकडील खराब / कालबाह्य झालेल्या अनावर्ती साहित्यांचे निर्लेखन करावयाची बाब विचारार्थ.** | अभियांत्रिकी विभाग |

टिपणी: विद्यापीठातील विविध संकुले व विभागाकडील खराब / कालबाह्य झालेल्या अनावर्ती साहित्य निर्लेखन करण्यासाठी निर्लेखन समिती यांचेकडून खालीलप्रमाणे शिफारस अहवाल प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | संकुलाचे नाव | घसारा वजा जाता साहित्यांची किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | रसायनशास्त्र संकुल | ६,६४,९९७/- |
| २ | शास्त्रीय उपकरण केंद्र | १०,००४/- |
| ३ | पदार्थविज्ञान संकुल | २,२१,७४१/- |
| ४ | परीक्षा व मूल्यमापन मंडळ | ८१,४५९/- |
| ५ | कुलसचिव कार्यालय | ३,१२०/- |
| ६ | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | २७,४५३/- |
| ७ | संगणकशास्त्र संकुल | ४३,४५३/- |
| ८ | ज्ञानस्रोत केंद्र | १३,२९३/- |
| ९ | राष्ट्रीय सेवा योजना | ३,०९४/- |
| १० | आरोग्य केंद्र | ११,२४५/- |
| ११ | भूशास्त्र संकुल | ९६,२६८/- |
| | एकूण रुपये | ११,७६,५१२/- |

निर्लेखन करण्यासाठी समान लेखा संहिता (Common Account Code) मधील Appendix – I मध्ये Financial Delegation Power नुसार अधिकार दिले असून त्यातील I. [xvi and २ (ii)] नुसार व्यवस्थापन परिषदेने निर्लेखन नियमावलीमध्ये अनावर्तित बाबींसाठी रु.५०,०००/- वर असल्याने व्यवस्थापन परिषदेस निर्लेखन प्रस्तावास मंजुरी देण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

सबब, उपरोक्तप्रमाणे वित्त व लेखा विभागाच्या दि.१८/०७/२०२४ रोजीच्या टिपणीवरील मा.कुलगुरु महोदयांच्या मान्यतेनुसार व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्यात आला होता. तरी याच्या व्यतिरिक्त काही खराब व कालबाह्य झालेल्या वस्तू आढळल्यास पुढील योग्य ती कार्यवाही निर्लेखन समितीकडून करण्यास व तसे त्यांना लेखी पत्राद्वारे कळविण्यास तद्‌नंतर त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निविदा संदर्भात प्रसिध्दीकरण करणेकामी पुढील कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **विद्यापीठातील विविध संकुले व विभागाकडील खराब / कालबाह्य झालेल्या अनावर्ती साहित्यांचे निर्लेखन प्रक्रिया सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच खराब व कालबाह्य झालेल्या वस्तू एकत्रित करुन शासन निर्णयानुसार निर्लेखन करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | अध्यक्ष |
| २. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य |
| ३. | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य |
| ४. | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |
| ५. | सर्व संकुलांचे संचालक | सदस्य |
| ६. | खरेदी व भांडार विभागाकडील सहा.कुलसचिव | सदस्य सचिव |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७ ] | **प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील १० एकर परिसरामध्ये पेरणी करण्यात आलेल्या तूर शेतीमधील तूर स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरापैकी २० एकर परिसरामध्ये तूर व उडीद माहे जून मध्ये पेरणी करण्यात आली होती. त्यापैकी १० एकर परिसरामध्ये तूरीची लागवड करण्यात आली होते. पावसाळा जास्त असल्याने तूर पीक बराच भाग पाण्याखाली गेल्यामुळे खराब झालेला आहे. उर्वरित चांगला राहिलेल्या पीकाची काढणी करण्यात आलेली आहे. काढणी करण्यात आलेल्या तूरीची रास करण्यात आलेली आहे. रास केलेल्या उत्पन्न १२ पॅकेट झाले असून १ पॅकेट अंदाजे ७० ते ७५ किलो वजनाचे असून त्याचे वजन एकूण ८०० ते ९०० किलो इतके होत असून ते सद्य:स्थितीत स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करणे आवश्यक आहे.<br>सबब, सदरचे काढण्यात आलेल्या तूरीचे उत्पादन विक्री करणे आवश्यक असल्याने काढण्यात आलेली तूर स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करण्यास तसेच विक्री करुन प्राप्त झालेली रक्कम विद्यापीठ Sale of Agriculture Product in raw form या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकाखाली जमा करुन घेण्याची बाब विचारार्थ. | **राष्ट्रीय सेवा योजना विभाग** |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील १० एकर परिसरामध्ये पेरणी करण्यात आलेल्या तूर शेतीमधील तूर चालू दरानुसार स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ८ ] | **प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरामध्ये वृक्षारोपण करण्याकरिता २५० खजूराचे रोपे गुजरात येथून खरेदी करण्यास व गुजरात येथून आणण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरामध्ये विविध १,५२,००० वृक्षाची लागवड करण्यात आली आहे. लागवड करण्यात आलेल्या वृक्षांचे संगोपन व्यवस्थित करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने विद्यपीठ ४८२ एकर परिसरामध्ये खजूराची लागवड करण्याचा मानस आहे. तरी खजूराची लागवड करण्याकरिता २५० रोपे गुजरात येथून खरेदी करण्यास मान्यता असावी. खजूराचे रोप अंदाजे प्रति नग रु. ५,०००/- प्रमाणे २५० रोपे खरेदी करण्याकरिता अंदाजे एकूण रु.१२,५०,०००/- इतक्या खर्चास तसेच सदरची रोपे मे. अतुल लि. फ्लोरास बिजनेस, पी.ओ. अतुल ३६० ०२०, जिल्हा वलसाड, गुजरात येथून खरेदी करण्यास व गुजरात ते सोलापूर पर्यंत २५० रोपे आणण्याकरिता होणाऱ्या वाहतूक खर्चाची बाब विचारार्थ. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरामध्ये वृक्षारोपण करण्याकरिता प्रायोगिक तत्वावर ५० खजूराची रोपे गुजरात येथून खरेदी करण्यास व त्यासाठी रु.२.५० लाख पर्यंतच्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ९ ] | **प्रत्येक शैक्षणिक वर्षात University Department Ranking Framework मूल्यांकन अहवालानुसार प्रथम तीन क्रमांक मिळविलेल्या संकुलांना अनुदान/आर्थिक तरतूद करण्याची बाब विचारार्थ.** | आयक्युएसी विभाग |

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात University Department Ranking Framework (UDRF) ची अंमलबजावणी करण्यासाठी बहिस्थ: समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १३ व १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी सर्व संकुले व अध्यासनांना प्रत्यक्ष भेट देऊन सर्व निकषांच्या आधारे मूल्यमापन केले व अंतिम अहवाल तयार करुन तो विद्यापीठाकडे सादर केला आहे. त्यानुसार खालील प्रथम तीन संकुलांची क्रमवारी जाहीर करण्यात आली आहे.

| अ.क्र. | संकुल | UDRF क्रमवारी | अनुदान |
|---|---|---|---|
| 1. | School of Physical Sciences | I | |
| 2. | School of Chemical Sciences | II | |
| 3. | School of Social Sciences | III | |

तसेच आयक्युएसी समितीची बैठक दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विषय क्र. ८ नुसार UDRF-२०२५ मधील उच्च क्रमांक प्राप्त संकुलांना आर्थिक सहाय्य वाटप करण्यास खालीलप्रमाणे शिफारस करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| Item No. 8 | As per the Government of Maharashtra's GR dated 7th March, 2025, was communicated that to allocate financial assistance to the top-ranking schools in UDRF. This matter should be placed before University Authorities for consideration. |
| Resolution | it was recommended that, for allocation of financial assistance to top ranking schools in UDRF, detail item be placed before ensuing Management Council for consideration. |

ACTION: IQAC Section

सबब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च क्रमांक प्राप्त केलेल्या संकुलांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. तसेच आयक्यूएसी समितीच्या शिफारसीनुसार दरवर्षी प्रथम तीन क्रमांक प्राप्त केलेल्या संकुलांना प्रत्येक शैक्षणिक वर्षात अनुदान उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १० ]</td><td>

**M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd., Mumbai या फर्मच्या प्रतिनिधी सोबत वाटाघाटी (Negotiation) करुन दर अंतिम करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेद्वारे गठीत ६ सदस्यीय समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: विद्यापीठातील परीक्षा विभागाकडून प्राप्त प्रस्ताव झालेल्या Scanning ICR, OCR Digitization of Students Mark Sheet, Office Record and Web Portal Development या कामासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सदर निविदा विहित प्रक्रियेद्वारे उघडण्यात येवून तौलानिक तक्ता तयार करण्यात आला. सदरच्या न्युनतम दर असलेल्या M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd., Mumbai या फर्मला कामाचे आदेश देण्यासंदर्भात मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव दि.०५/१२/२०२५ च्या खरेदी समितीपुढे ठेवण्यात आला. खरेदी समितीने सदरचा प्रस्ताव वित्त व लेखा समितीकडे शिफारस केला. दि.०५/१२/२०२५ च्या वित्त व लेखा समितीने सदर M/s.Edulab Educational Exchange Pvt. Ltd., Mumbai या फर्मसोबत वाटाघाटी (Negotiation) करुन दर अंतिम निश्चित करण्यासाठी ५ सदस्यीय समिती गठीत करण्यात करुन तशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस केली.

व्यवस्थापन परिषदेच्या दि.०८/१२/२०२५ रोजीच्या ठराव क्र. ०८ नुसार Scanning ICR, OCR Digitization of Students Mark Sheet, Office Record and Web Portal Development या कामाच्या ई-निविदा प्रक्रियातून न्युनतम दर असलेल्या M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd., Mumbai या फर्मसोबत वाटाघाटी (Negotiation) करुन दर अंतिम निश्चित करण्यासाठी वित्त व लेखा समितीच्या शिफारसीवरुन ६ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्याचे नाव</th><th>पदनाम</th></tr>
<tr><td>१.</td><td>प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>श्री. सुधाकर तुकाराम सरवदे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>श्री. सचिन मारुती गायकवाड</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४.</td><td>डॉ. अतुल तानाजी लकडे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५.</td><td>डॉ. आर. एस. मेंते</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>६.</td><td>श्री. पी. आर. चोरमले</td><td>सदस्य</td></tr>
</table>

सदर फर्मसोबत वाटाघाटी (Negotiation) करुन दर अंतिम निश्चित करण्यासाठी गठित ६ सदस्यीय समितीची बैठक बुधवार, दि.१७/१२/२०२५ रोजी संपन्न होवून, ई-निविदेमधील न्युनतम दर असलेल्या M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd., Mumbai या फर्मच्या प्रतिनिधी सोबत वाटाघाटी (Negotiation) करुन दर अंतिम करुन त्याचा अहवाल सोबत जोडल्याप्रमाणे सादर करण्यात आला. सदरचा अहवाल वित्त व लेखा समितीच्या दि.३०/१२/२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विषय क्र.०३(१) नुसार सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

<table>
<tr><td>ठराव:</td><td>वाटाघाटी करण्याकरिता गठीत केलेल्या समितीने न्युनतम दर असलेली फर्म M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd., Mumbai यांचेसोबत वाटाघाटी करुन अंतिम केलेल्या दराप्रमाणे सादर केलेला अहवाल स्विकारुन पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस सर्वानुमते करण्यात आली.</td></tr>
</table>

सबब, उपरोक्त केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

</td><td>खरेदी व भांडार विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd., Mumbai या फर्मच्या प्रतिनिधी सोबत वाटाघाटी (Negotiation) करुन अंतिम केलेल्या दराप्रमाणे व्यवस्थापन परिषदेद्वारे गठीत ६ सदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालानुसार पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करण्याबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये आजी - माजी विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी नियमित स्वरुपात विद्यापीठ परिसरामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यान्वित करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र.१९ अन्वये केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: दि.०३/१०/२०२५ रोजी अधिसभेची बैठक संपन्न झालेल्या असून डॉ. अनिल अर्जुन घनवट, अधिसभा सदस्य यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव मांडला होता.<br>"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये आजी - माजी विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी नियमित स्वरुपात विद्यापीठ परिसरामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यन्वित करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेकडे करत आहे."<br>सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव १९ पारित करण्यात आला.<br>ठराव क्र. १९: सदरचा प्रस्ताव डॉ. अनिल अर्जुन घनवट यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये आजी - माजी विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी नियमित स्वरुपात विद्यापीठ परिसरामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यान्वित करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र.१९ अन्वये केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | रसायनशास्त्र संकुल |
| ठराव: | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये आजी - माजी विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी नियमित स्वरुपात विद्यापीठ परिसरामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यान्वित करण्याबाबत दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र.१९ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>सदरचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र नवीन प्रशासकीय इमारत झाल्यानंतर सुरु करावे असे ठरले | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | दि.३०/१२/२०२५ रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४९ अन्वये माहिती व तंत्रज्ञान मंडळ (IT Cell) ची स्थापना करण्यात असून सदर मंडळाची दि.३०/१२/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये Computer, Hardware & Software संदर्भातील Configuration तयार करणे, त्यासाठी अंदाजित येणाऱ्या खर्चाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आलेली आहे.<br>सबब, दि.३०/१२/२०२५ रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | माहिती व तंत्रज्ञान मंडळ |
| ठराव: | दि.३०/१२/२०२५ रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

Mahd-

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १३ ]</td><td>विद्यापीठ आरोग्यकेंद्रामध्ये मानसिक समुपदेशक तसेच इतर तज्ञ डॉक्टरांच्या सेवा व्हिझीटिंग स्वरुपात सुरु करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार प्रस्तुत विद्यापीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी मानसिक समुपदेशक नेमण्याच्या सूचना मिळाल्या आहेत. सद्य:स्थितीमध्ये विद्यापीठात मानसिक समुपदेशक नियुक्त नसल्याने त्याची नव्याने कंत्राटी अथवा मानसेवी तत्वावर अथवा व्हिझीटींग स्वरुपात नियुक्ती करावी लागेल. त्याकरीता विद्यापीठात सुरु असलेल्या मानसशास्त्र अभ्यासक्रमाचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांची मदत देखील घेता येऊ शकते. सदरचा मानसिक समुपदेशक हा नियमितपणे विद्यापीठात उपलब्ध असावा लागणार असल्याने त्यासाठी कंत्राटी स्वरुपात नियुक्ती करुन त्यांना प्रतिमाह मानधन द्यावे लागणार आहे व त्यासाठी स्वतंत्रपणे आर्थिक तरतूद करावी लागणार आहे.<br>त्याचसोबत विद्यापीठात गत शैक्षणिक वर्षात अनेक नवीन अभ्यासक्रम सुरु झालेले असून विद्यापीठ परिसरात शिक्षण घेणाऱ्या तसेच वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली आहे. त्यांना अधिक चांगल्या प्रकारे आरोग्य सेवा देता याव्यात यासाठी फिजिशियन, स्त्री रोग व त्वचा रोग तसेच नेत्र रोग अशा तज्ञ डॉक्टरांच्या सेवा आरोग्य केंद्रात व्हिझीटिंग स्वरुपात सुरु करण्याचा मानस आहे. आरोग्य केंद्रात व्हिझीटिंग स्वरुपात सेवा देऊ करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांना प्रती व्हिझीट काही रक्कम मानधन स्वरुपात द्यावी लागेल. त्यासाठी चालू तसेच पुढील आर्थिक वर्षात आरोग्य केंद्राने रु.१ लाख इतकी तरतूद केलेली आहे. तसेच सदर तज्ञ डॉक्टरांच्या सेवा या पूर्णपणे मोफत न ठेवता विद्यार्थ्यांना विनाशुल्क व इतरांना नाममात्र शुल्क आकारुन सेवा देता येऊ शकेल जेणेकरुन विद्यापीठावर जास्त आर्थिक बोजा पडणार नाही.<br>सबब, उपरोक्त बाबींचा विचार करता विद्यापीठ आरोग्य केंद्रामध्ये पूर्णवेळ कंत्राटी स्वरुपात मानसिक समुपदेशक नेमण्याचा तसेच इतर तज्ञ डॉक्टरांच्या सेवा व्हिझीटिंग स्वरुपात सुरु करण्याची बाब विचारार्थ.</td><td>आरोग्य केंद्र</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>विद्यापीठ आरोग्यकेंद्रामध्ये मानसिक समुपदेशक नेमण्यास व त्यांना प्रती माह रु. २५,०००/- मानधन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच खालीलप्रमाणे तज्ञ डॉक्टरांच्या सेवा व्हिझीटिंग स्वरुपात सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तज्ञ डॉक्टर</th><th>प्रती महिना भेट</th><th>मानधन</th></tr>
<tr><td>१.</td><td>फिजिशन (Phygision)</td><td>१</td><td>₹ 3,000/- (Per Visit)</td></tr>
<tr><td>२.</td><td>स्त्रीरोगतज्ञ (Gynecologist)</td><td>१</td><td>₹ 3,000/- (Per Visit)</td></tr>
</table></td><td></td></tr>
</table>

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[१४(१)]</td><td>

**Dr. Dwarkanath Kotnis Centre for International Policy Research, Foreign Languages and Skill Development (DK-CIPRFLS) केंद्राचा प्रस्ताव मा. कुलगुरु महोदयांनी गठीत करुन दिलेल्या समितीने सर्वंकष अभ्यास करुन दिनांक ३०/१२/२०२५ रोजी आस्थापना विभागास सादर केला असून, सदर प्रस्ताव सोलापूर महानगरपालिका, महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांच्या सहमतीने चिनी दूतावासाकडे आर्थिक सहायतेकरिता पाठविण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: स्थानिक सोलापूर शहरात अण्णाभाऊ साठे चौक येथे डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक असून, त्या समोरील बाजूस महानगरपालिकेची जागा आहे. सदरील जागेमध्ये डॉ. द्वारकानाथ कोटणीस अध्यासन केंद्र सुरु करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. त्यासाठी चिनी भाषा व विविध परकीय भाषा प्रशिक्षण, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, विद्यार्थी स्पर्धा परीक्षा व मार्गदर्शन, डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या विषयी संशोधन करणे करिता Dr. Dwarkanath Kotnis Centre for International Policy Research, Foreign languages and Skill Development (DK-CIPRFLS) केंद्र सुरु करावयाचे आहे. यास्तव मा. कुलगुरु महोदयांनी प्रस्ताव तयार करणेकामी खालीलप्रमाणे समिती गठीत केली होती.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>नाव</th><th>पदनाम</th></tr>
<tr><td>१.</td><td>डॉ. गौतम कांबळे</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>डॉ. प्रभाकर कोळेकर</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>डॉ. तेजस्विनी कांबळे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४.</td><td>डॉ. अभिजीत जगताप</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५.</td><td>ॲड जावेद खैरदी</td><td>सदस्य-सचिव</td></tr>
</table>

उपरोक्त समितीची बैठक दिनांक १९/१२/२०२५ रोजी विद्यापीठ कार्यालयात संपन्न् झाली. सदर समितीने सर्वंकष अभ्यास करुन Dr. Dwarkanath Kotnis Centre for International Policy Research, Foreign languages and Skill Development (DK-CIPRFLS) केंद्राचा प्रस्ताव तयार करुन आस्थापना विभागास सादर केला आहे.

सबब, Dr. Dwarkanath Kotnis Centre for International Policy Research, Foreign languages and Skill Development (DK-CIPRFLS) केंद्राचा प्रस्ताव मा. कुलगुरु महोदयांनी गठीत करुन दिलेल्या समितीने सर्वंकष अभ्यास करुन दिनांक ३०/१२/२०२५ रोजी आस्थापना विभागास सादर केला असून, सदर प्रस्ताव सोलापूर महानगरपालिका, महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांच्या सहमतीने चिनी दूतावासाकडे आर्थिक सहायतेकरिता पाठविण्याची बाब विचारार्थ.

</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**Dr. Dwarkanath Kotnis Centre for International Policy Research, Foreign Languages and Skill Development (DK-CIPRFLS) केंद्राचा प्रस्ताव आर्थिक सहायतेकरिता सोलापूर महानगरपालिका, महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांच्या सहमतीने चिनी दूतावासाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४(२)] | **प्रवेश व परीक्षा याकरिता देण्यात येणाऱ्या विविध देयकावर वस्तु व सेवा कर (GST) माफ असल्याने वस्तु व सेवा कर (GST) लागू होत नाही, त्यास अनुसरुन प्रवेश व परीक्षा विभागास संबंधित असणारे सर्व पुरवठा आदेश दुरुस्ती करुन सुधारित पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रवेश व परीक्षा याकरिता देण्यात येणाऱ्या विविध देयकावर वस्तू व सेवा कर (GST) माफ असल्याचे जीएसटी सल्लागार श्री. पंकज खेर, सनदी लेखापाल यांनी कळविले आहे. GST Notification No. 12/2017 as ameded by Notification No.02/2018 नुसार प्रवेश व परीक्षा विभागास लागणाऱ्या सर्व वस्तू व सेवा यांच्या देयकावरती वस्तू व सेवा कर (GST) माफ आहे.<br>यापूर्वी दिलेल्या पुरवठा आदेशांमध्ये GST माफी विषयी स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे सर्व देयके GST करासहित देण्यात येत आहेत. ते GST कर वरील Notification नुसार वाचविण्यासाठी नवीन सुधारित आदेश देणे आवश्यक आहे.<br>सबब, प्रवेश व परीक्षा याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तु व सेवा यांच्या विविध देयकावर वस्तु व सेवा कर (GST) माफ असल्याने वस्तु व सेवा कर (GST) लागू होत नाही, त्यामुळे प्रवेश व परीक्षा विभागास संबंधित असणारे, तसेच त्यास अनुषंगिक इतर ही सर्व पुरवठा आदेश दुरुस्ती करुन सुधारित पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **प्रवेश व परीक्षा याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तु व सेवा यांच्या विविध देयकावर वस्तु व सेवा कर (GST) माफ असल्याने वस्तु व सेवा कर (GST) लागू होत नाही, त्यामुळे प्रवेश व परीक्षा विभागास संबंधित असणारे, तसेच त्यास अनुषंगिक इतर ही सर्व पुरवठा आदेश दुरुस्ती करुन सुधारित पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४(३)] | **वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दिनांक १२ ते १५ जानेवारी, २०२६ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव - २०२५ साठी जाणाऱ्या ४८ विद्यार्थ्यांना व त्यांच्या सोबत जाणाऱ्या सात कर्मचाऱ्यांना ब्लेझर शिलाई करुन घेण्याकरिता खासबाब म्हणून गेल्या वर्षी शिलाई करुन दिलेल्या (एस.एन.टेलर अॅन्ड ड्रेस सप्लायर, सोलापूर) या फर्मला पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: मा. महामहिम राज्यपाल महोदय यांच्या कार्यालयाकडून अविष्कार या संशोधन महोत्सवाचे प्रतिवर्षी आयोजन केले जाते. यास्तव प्रतिवर्षाप्रमाणे प्रथम विद्यापीठस्तरावर अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करुन राज्यस्तरीय संघाची निवड केली जाते. त्यानुसार विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव- २०२५ दि.२९ व ३० डिसेंबर, २०२५ रोजी व्ही. जी. शिवदारे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर येथे संपन्न झालेला आहे व त्या महोत्सवातून ४८ स्पर्धक निवडले जाणार आहेत.<br>त्याअनुषंगाने राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव, २०२५ साठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि.१२ ते १५ जानेवारी, २०२६ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी मा.कुलगुरु महोदय यांची अविष्कार स्पर्धकासाठी ब्लेझर शिलाई करुन घेण्याकरिता दरपत्रकाबाबत मान्यता घेण्यात आली होती. परंतू, निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात निवडणूकीची आचार संहिता दिनांक १५/१२/२०२५ पासून लागू झालेली आहे.<br>सबब, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दिनांक १२ ते १५ जानेवारी, २०२६ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव - २०२५ साठी जाणाऱ्या ४८ विद्यार्थ्यांना व त्यांच्या सोबत जाणाऱ्या सात कर्मचाऱ्यांना ब्लेझर शिलाई करुन घेण्याकरिता खासबाब म्हणून गेल्या वर्षी शिलाई करुन दिलेल्या (एस.एन.टेलर अॅन्ड ड्रेस सप्लायर, सोलापूर) या फर्मला पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ. | नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ |
| ठराव: | **वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दिनांक १२ ते १५ जानेवारी, २०२६ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव - २०२५ साठी जाणाऱ्या ४८ विद्यार्थ्यांना व त्यांच्या सोबत जाणाऱ्या सात कर्मचाऱ्यांना एस.एन.टेलर अॅन्ड ड्रेस सप्लायर, सोलापूर यांचेकडून प्रती नग रु.२,१२५/- (सर्व करासहित) या दराने ब्लेझर शिलाई करुन घेण्यास खासबाब म्हणून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद